**L. A. BILL No. XL OF 2023.**

A BILL

TO MAKE SPECIAL PROVISIONS TO PROVIDE COMPENSATION TO FARMERS FOR LOSS CAUSED DUE TO SALE AND USE OF ADULTERATED, NON-STANDARD OR MISBRANDED SEEDS, FERTILIZERS OR INSECTICIDES IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४०.

**महाराष्ट्र राज्यातील, भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता विशेष तरतुदी करण्याकरिता विधेयक.**

१९६६ चा ५४.
१९६८ चा ४६.
१९५५ चा १०.

**ज्याअर्थी,** भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी आणि अशा बाबींमधील त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी, बियाणे अधिनियम, १९६६, कीटकनाशके अधिनियम, १९६८ व त्याखाली केलेले नियम आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ व बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ आणि खते (असेंद्रिय, सेंद्रिय व मिश्र) (नियंत्रण) आदेश, १९८५ यांखाली कोणत्याही तरतुदी केलेल्या नाहीत ;

**आणि ज्याअर्थी,** खरीप हंगाम सुरू झाला आहे, आणि भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके आणि बीज अंकुरण न होणे यासंबंधात असंख्य तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील, भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता विशेष तरतुदी करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र (भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेल्या नुकसानीकरिता) शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या. **२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,—

(क) " भेसळयुक्त " याचा अर्थ, दुय्यम दर्जाची अन्य बियाणे, खते व कीटकनाशके किंवा इतर कोणताही पदार्थ टाकून किंवा मिसळून बियाणे, खत व कीटकनाशक निकृष्ट किंवा दुय्यम दर्जाचे बनविण्याची कृती, असा आहे ;

(ख) " आयुक्त " याचा अर्थ, कृषी आयुक्त, असा आहे ;

(ग) " जिल्हा प्राधिकरण " याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी शासनाने अधिसूचित केलेले जिल्हा प्राधिकरण, असा आहे ;

(घ) " आर्थिक नुकसान पातळी (इकॉनॉमिक थ्रेशहोल्ड लिमिट) (इटीएल) " याचा अर्थ, पिकांच्या नुकसानीस प्रतिबंध करण्याकरिता वाढत्या किडीच्या संख्येविरुद्ध ज्या मर्यादेनंतर नियंत्रक उपाययोजना सुरू केल्या पाहिजे, ती किडीच्या व रोगाच्या संख्येची घनता, असा आहे ;

(ङ) " शेतकरी " याचा अर्थ, जी व्यक्ती, एकतर स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत, जमीन लागवड करून पिके घेते अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(च) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(छ) " निरीक्षक " याचा अर्थ, बियाण्यांच्या संबंधात, बियाणे अधिनियम, १९६६ अन्वये नियुक्त केलेला बियाणे निरीक्षक, असा आहे ; खतांच्या संबंधात, खत (असेंद्रीय, सेंद्रीय किंवा मिश्र) (नियंत्रण) आदेश, १९८५ अन्वये नियुक्त केलेला खत निरीक्षक, असा आहे ; कीटकनाशकांच्या संबंधात, कीटकनाशक अधिनियम, १९६८ अन्वये नियुक्त केलेला कीटकनाशक निरीक्षक, असा आहे ; १९६६ चा ५४. १९६८ चा ४६.

(ज) " अन्वेषण समिती " याचा अर्थ, कलम ५ अन्वये घटित केलेली अन्वेषण समिती किंवा समित्या, असा आहे ;

(झ) " गैरछापाचे खत " याचा अर्थ, खत (असेंद्रिय, सेंद्रिय व मिश्र) (नियंत्रण) आदेश, १९८५ याच्या खंड १९ च्या उप-खंड (ग) मध्ये नमूद केलेले कोणतेही खत, असा आहे ;

(ञ) " गैरछापाचे कीटकनाशक " याचा अर्थ, कीटकनाशके अधिनियम, १९६८ याच्या कलम ३ च्या खंड (ट) मध्ये व्याख्या केलेले गैरछापाचे कीटकनाशक, असा आहे ; १९६८ चा ४६.

(ट) " गैरछापाचे बियाणे " याचा अर्थ, जर एखादे बियाणे,—

(एक) ज्या नावाखाली ते विकले जात असेल त्या बियाण्याच्या वाणाऐवजी अन्य वाण, त्या नावाने विकले जात असेल, किंवा फसवणूक होण्याचा संभव असेल अशा रीतीने त्या वाणास

सादृश्य नाव दिलेले असेल आणि त्याचे खरे स्वरूप दर्शविता यावे म्हणून त्यावर स्पष्टपणे व ठळकपणे लेबल लावलेला नसेल तर ;

(दोन) ते कोणत्याही ठिकाणचे किंवा देशाचे उत्पादन असल्याचे खोटे नमूद केलेले असेल तर ;

(तीन) जे नाव, बियाण्यांच्या अन्य प्रकाराचे किंवा वाणाचे नाव असेल त्या नावाने ते विकले जात असेल तर ;

(चार) लेबलवर किंवा अन्यथा, त्याबाबत खोटे दावे केले जात असतील तर ;

(पाच) लेबलवर, बीज अंकुरणाच्या व शुद्धतेच्या किमान मर्यादा ठळकपणे व अचूकपणे अंतर्भूत केलेल्या नसतील तर ;

(सहा) ते अंतर्भूत असलेल्या आवेष्टनावर किंवा आवेष्टनावरील लेबलवर, त्यात अंतर्भूत असलेल्या बियाण्याची गुणवत्ता अथवा प्रकार किंवा वाण या संबंधात, जे कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलाच्या बाबतीत खोटे किंवा दिशाभूल करणारे आहे असे कोणतेही विवरण किंवा संकल्पचित्र असेल अथवा जर आवेष्टन, त्यात अंतर्भूत असलेल्या वस्तूंच्या बाबतीत अन्यथा फसवणूक करणारे असेल तर ;

(सात) संबंधित नियंत्रण आदेशाद्वारे किंवा त्यान्वये आवश्यक असलेल्या रीतीने व्यापाऱ्याचा नोंदणी क्रमांक छापलेला नसेल तर ;

(आठ) लेबलवर, व्यापाऱ्याचा खोटा नोंदणी क्रमांक अंतर्भूत असेल तर ;

(नऊ) ज्यांचे पालन केल्यास, मानव, प्राणी व वनस्पती यांचे जीवन व आरोग्य यांचे संरक्षण व्हावे किंवा पर्यावरणाला पोहचणारी गंभीर बाधा टाळता यावी यासाठी, आवश्यक व पुरेसा असू शकेल असा इशारा किंवा सावधगिरीच्या सूचना, त्याच्या लेबलवर अंतर्भूत नसतील तर ;

(दहा) ते अंतर्भूत असलेल्या आवेष्टनावर किंवा आवेष्टनावरील लेबलवर, त्या प्रकाराचा किंवा वाणाचा व्यापारी म्हणून कपोलकल्पित व्यक्तीचे किंवा कंपनीचे नाव असेल तर ; किंवा

१९६६ चा (अकरा) बियाणे अधिनियम, १९६६ किंवा बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ अथवा
५४. त्याखाली केलेले नियम यांच्या आवश्यकतांनुसार त्यावर लेबल लावलेला नसेल तर,

असे बियाणे हे, गैरछापाचे बियाणे असल्याचे मानण्यात येईल ;

(ठ) "अप्रमाणित" याचा अर्थ, जे बियाणे, खत किंवा कीटकनाशके, संबंधित अधिनियमाद्वारे किंवा संबंधित आदेशाद्वारे किंवा संबंधित नियमांद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या किंवा विहित केलेल्या अथवा उत्पादकाने दावा केलेल्या मानकांची पूर्तता करीत नाहीत असे बियाणे, खत किंवा कीटकनाशके, असा आहे ;

(ड) "वनस्पती विषकारकता (फायटोटॉक्सिसीटी)" याचा अर्थ, रासायनिक पदार्थांमुळे वनस्पतींच्या वाढीवर, वनस्पती शरीरक्रीयाशास्त्रावर किंवा चयापचयावर झालेला कोणताही प्रतिकूल परिणाम, असा आहे आणि त्यात, वाढ खुंटणे किंवा वनस्पती मरणे आणि वनस्पतीची बदललेली चयापचय व्यवस्था यांचा समावेश होतो ;

(ढ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ण) "उत्पादक" याचा अर्थ, जी, बियाण्यांचे उत्पादन करते किंवा उत्पादन करण्याची व्यवस्था करते अथवा जी, खतांचे किंवा कीटकनाशकांचे उत्पादन करते अशी व्यक्ती, व्यक्तींचा गट, व्यवसाय संस्था किंवा कंपनी किंवा संघटना, असा आहे ;

(त) “ संबंधित अधिनियम ” याचा अर्थ,—

(एक) खतांच्या संबंधात, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, असा आहे ; १९५५ चा १०.

(दोन) बियाण्यांच्या संबंधात, बियाणे अधिनियम, १९६६, असा आहे ; १९६६ चा ५४.

(तीन) कीटकनाशकांच्या संबंधात, कीटकनाशके अधिनियम, १९६८, असा आहे ; १९६८ चा ४६.

(थ) “ संबंधित आदेश ” याचा अर्थ, बियाण्यांच्या संबंधात, बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३, असा आहे, आणि खतांच्या संबंधात, खते (असेंद्रिय, सेंद्रिय व मिश्र) (नियंत्रण) आदेश, १९८५, असा आहे ;

(द) “ संबंधित नियम ” याचा अर्थ, बियाण्यांच्या संबंधात, बियाणे नियम, १९६८, असा आहे आणि कीटकनाशकांच्या संबंधात, कीटकनाशके नियम, १९७१, असा आहे ;

(ध) “ किडीस प्रतिरोधक ” याचा अर्थ, जेव्हा किडीच्या संख्येची घनता, संबंधित कृषी विद्यापीठाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (इकॉनॉमिक थ्रेशहोल्ड लिमिट) नगण्य किंवा खूपच कमी असते तेव्हा, अशा बियाण्यांचे वाण हे, किडीस प्रतिरोधक असते, असे म्हटले जाते ;

(न) “ किडीस संवेदनक्षम ” याचा अर्थ, जेव्हा किडीच्या संख्येची घनता, संबंधित कृषी विद्यापीठाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (इकॉनॉमिक थ्रेशहोल्ड लिमिट) अधिक असते तेव्हा, अशा बियाण्यांचे वाण हे, किडीस संवेदनक्षम असते, असे म्हटले जाते ;

(प) “ किडीस सहनक्षम ” याचा अर्थ, जेव्हा किडीच्या संख्येची घनता, संबंधित कृषी विद्यापीठाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या आर्थिक नुकसान पातळीच्या (इकॉनॉमिक थ्रेशहोल्ड लिमिट) जवळपास असते परंतु आर्थिक नुकसान पातळीपेक्षा अधिक नसते तेव्हा, अशा बियाण्यांचे वाण हे, किडीस सहनक्षम असते, असे म्हटले जाते.

(२) या अधिनियमात वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, अनुक्रमे, अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, बियाणे अधिनियम, १९६६, किटकनाशके अधिनियम, १९६८ आणि बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ व खते (असेंद्रिय, सेंद्रिय व मिश्र) (नियंत्रण) आदेश, १९८५ यांमध्ये, जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच अर्थ असतील. १९६६ चा ५४. १९६८ चा ४६. १९५५ चा १०.

नुकसानभरपाई. **३.** शेतकऱ्याने खरेदी केलेले व वापरलेले बियाणे, खते किंवा कीटकनाशके भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची असल्याचे आढळून आले असेल तर, असा शेतकरी, पुढील प्रकरणांमध्ये, या अधिनियमान्वये, नुकसानभरपाई मिळण्यास हक्कदार असेल :—

(१) बियाण्यांच्या बाबतीत,—

(क) जर बीज अंकुरण, बियाणे अधिनियम, १९६६ अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या किंवा उत्पादकाने दावा केलेल्या बीज अंकुरण टक्केवारीपेक्षा कमी असेल तर ; १९६६ चा ५४.

(ख) उत्पादकाने, बियाण्याचा वाण, कीड व रोग प्रतिरोधक आहे असा दावा लेबलवर केलेला असला तरी, संबंधित कृषी विद्यापीठाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (इकॉनॉमिक थ्रेशहोल्ड लिमिट) अधिक प्रमाणात कीड व रोगांची लागण होणे ;

(ग) उत्पादकाने, बियाण्याचा वाण, कीड व रोग सहनक्षम आहे असा दावा लेबलवर केलेला असला तरी, संबंधित कृषी विद्यापीठाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या आर्थिक नुकसान पातळीपेक्षा (इकॉनॉमिक थ्रेशहोल्ड लिमिट) अधिक प्रमाणात कीड व रोगाची लागण होणे ;

(घ) केंद्र सरकारने अधिसूचित केलेल्या किंवा उत्पादकाने दावा केलेल्या शिफारस प्राप्त कृषिक्षेत्राच्या किंवा प्रदेशाच्या बाहेर बियाण्यांची विक्री करणे ;

(ङ) भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाच्या बियाण्यांची विक्री करणे ;

(च) बीज अंकुरण, कीड व रोग प्रतिरोधक किंवा सहनक्षम आणि जनुकीय शुद्धता यांच्या बाबतीत, आवेष्टनावर छापलेल्या अतिरिक्त दाव्याची पूर्तता न करणे;

(छ) शासन, नियमांद्वारे विहित करील अशी अन्य प्रकरणे.

(२) खतांच्या बाबतीत,—

(क) भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाच्या खतांची विक्री करणे ;

(ख) आवेष्टनावर केलेल्या दाव्याचे अनुपालन न करणाऱ्या खतांची विक्री करणे ;

(ग) खतांच्या वापरामुळे वनस्पती विषकारकता (फायटोटॉक्सिसीटी) निर्माण होणे ;

(घ) शासन, नियमांद्वारे विहित करील अशी अन्य प्रकरणे.

(३) किटकनाशकांच्या बाबतीत,–

(क) भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाच्या कीटकनाशकांची विक्री करणे ;

(ख) आवेष्टनावर केलेल्या दाव्याचे अनुपालन न करणाऱ्या, कीटकनाशकांची विक्री करणे ;

१९६८ चा ४६.

(ग) कीटकनाशके अधिनियम, १९६८ अन्वये प्रतिबंधित केलेल्या विवक्षित कीटकनाशकांच्या विक्रीमुळे झालेले नुकसान ;

(घ) कीटकनाशकांच्या वापरामुळे वनस्पती विषकारकता (फायटोटॉक्सिसीटी) निर्माण होणे ;

(ङ) शासन नियमांद्वारे विहित करील अशी अन्य प्रकरणे.

शेतकऱ्यांच्या तक्रारींवर कार्यवाही करण्याची कार्यपद्धती.

**४.** (१) शेतकऱ्याला, कलम ३ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने, तालुका कृषी अधिकाऱ्याकडे लेखी तक्रार करता येईल.

(२) शेतकरी, तक्रारीसोबत, बियाणे, खते किंवा कीटकनाशके खरेदी केल्याच्या पावतीची प्रत, कोणतीही असल्यास, चिन्हे, किंवा लेबल असलेले त्यांचे कंटेनर किंवा बॅगा सादर करील.

(३) (क) निकृष्ट बीज अंकुरणाच्या बाबतीत, पेरणी केल्यानंतर वीस दिवसांच्या आत, तक्रार दाखल करण्यात येईल ;

(ख) बियाणे उत्पादकाने, कीड व रोगांची लागण होणार नाही असा दावा केलेला असताना, कीड व रोगाची लागण झालेली असेल त्याबाबतीत, अशी घटना निदर्शनास आल्यानंतर, अठ्ठेचाळीस तासांच्या आत, तक्रार दाखल करण्यात येईल;

(ग) जनुकीय अशुद्धतेच्या बाबतीत, पन्नास टक्के फुलोरा आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, किंवा संबंधित कृषी विद्यापीठाने विनिर्दिष्ट केलेल्या उचित टप्प्यावर, तक्रार दाखल करण्यात येईल ;

(घ) खतांच्या बाबतीत, वनस्पती विषकारकता (फायटोटॉक्सिसीटी) निर्माण होत असल्याची घटना निदर्शनास आल्यानंतर अठ्ठेचाळीस तासांच्या आत, तक्रार दाखल करण्यात येईल ;

(ङ) कीटकनाशकांच्या बाबतीत, कीड व रोगांची लागण झाल्याच्या आणि वनस्पती विषकारकता (फायटोटॉक्सिसीटी) निर्माण होत असल्याची घटना घडल्यानंतर अठ्ठेचाळीस तासांच्या आत, तक्रार दाखल करण्यात येईल ;

(च) अन्य कोणत्याही प्रकरणी, शासन, नियमांद्वारे विहित करील अशा कालावधीत तक्रार दाखल करण्यात येईल.

(४) या कलमान्वये, तक्रार प्राप्त झाल्यानंतर, तालुका कृषी अधिकारी, ती, चौकशीसाठी तात्काळ अन्वेषण समितीकडे पाठवील.

अन्वेषण समिती.

**५.** (१) आयुक्त, कलम ३ मध्ये नमूद केलेल्या प्रकरणी, तक्रारदारास सोसाव्या लागलेल्या पीक नुकसानीचे निर्धारण व मूल्यमापन करण्यासाठी वेळोवेळी, अन्वेषण समिती किंवा समित्या घटित करील.

(२) अन्वेषण समितीमध्ये, तालुका कृषि अधिकारी याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कृषी विभागाचा अधिकारी, संबंधित कृषी विद्यापीठातील किंवा कृषी विज्ञान केंद्रातील किंवा कृषी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ आणि संबंधित अधिनियमाखालील किंवा संबंधित नियंत्रण आदेशाखालील निरीक्षक यांचा समावेश असेल.

(३) अन्वेषण समिती, सविस्तर अन्वेषण करण्याकरिता, तक्रार प्राप्त झाल्यानंतर तत्काळ, तक्रारदाराच्या संबंधित शेतीला भेट देईल. अन्वेषण समिती, उत्पादक व तक्रारदार शेतकरी यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत, निरीक्षण करील. अन्वेषण समिती, तिला योग्य वाटेल अशी आवश्यक चौकशी करील.

(४) अन्वेषण समिती, तिच्या निष्कर्षांचा तपशीलवार अहवाल तयार करील आणि तालुका कृषी अधिकाऱ्याकडून तक्रार मिळाल्यानंतर दहा दिवसांच्या आत, तो, जिल्हा प्राधिकरणाकडे, त्याच्या विचारार्थ पाठवील.

नुकसान भरपाई देणे.

**६.** (१) राज्य शासन, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा सदस्यांचा समावेश असलेले जिल्हा प्राधिकरण, प्रत्येक जिल्ह्यासाठी घटित करील.

(२) जिल्हा प्राधिकरणास, त्याच्यासमोर सादर केलेला अन्वेषण समितीचा अहवाल आणि अन्य दस्तऐवज विचारात घेतल्यानंतर आणि तक्रारदारास तसेच उत्पादकास, वितरकास किंवा विक्रेत्यास म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, उत्पादकाकडून, वितरकाकडून किंवा विक्रेत्याकडून तक्रारदारास उचित नुकसानभरपाई प्रदान करण्याचा निवाडा देता येईल किंवा त्याची कारणे लेखी नमूद करून, ती फेटाळता येईल.

(३) जिल्हा प्राधिकरण, अन्वेषण समितीचा अहवाल प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत, एकतर नुकसान भरपाईचा यथोचित निवाडा देईल किंवा तक्रार फेटाळील.

(४) आयुक्तास, संबंधित कृषी विद्यापीठाशी विचारविनिमय करून, या अधिनियमान्वये प्रदान करावयाची नुकसान भरपाई निर्धारित करण्याचे निकष व कार्यपद्धती विनिर्दिष्ट करणारी मार्गदर्शकतत्त्वे, वेळोवेळी, जारी करता येतील.

(५) जिल्हा प्राधिकरणास, पुढील बाबींच्या संबंधातील दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये, दिवाणी न्यायालयामध्ये जे अधिकार निहित असतात ते अधिकार असतील :— १९०८ चा ५.

(क) कोणत्याही प्रतिवादीला किंवा साक्षीदाराला समन्स काढणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि साक्षीदारांची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) साक्षीपुरावा म्हणून कोणताही दस्तऐवजाच्या किंवा अन्य महत्वाच्या वस्तूचा शोध घेण्यास व ते सादर करण्यास फर्माविणे ;

(ग) शपथपत्रांवर पुरावा घेणे ;

(घ) संबंधित विश्लेषणाचा अहवाल मागवणे किंवा यथोचित प्रयोगशाळेकडून किंवा अन्य कोणत्याही स्रोताकडून चाचणी करणे ;

(ङ) कोणत्याही साक्षीदाराची किंवा दस्तऐवजाची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे.

नुकसानभरपाईचे प्रदान.

**७.** जिल्हा प्राधिकरणाने निवाडा दिलेली नुकसानभरपाई, नुकसानभरपाईचा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत, उत्पादकाकडून किंवा वितरकाकडून किंवा विक्रेत्याकडून तक्रारदारास प्रदान करण्यात येईल. प्रदान करण्यात विलंब केल्यास, दर साल बारा टक्के दराने व्याज आकारण्यात येईल.

अपील.

**८.** जिल्हा प्राधिकरणाच्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, जिल्हा प्राधिकरणाचा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, विहित करण्यात येईल अशा शुल्कासह, आयुक्ताकडे अपील करता येईल. अशा अपिलामधील आयुक्ताचा निर्णय अंतिम असेल :

परंतु, जिल्हा प्राधिकरणाच्या आदेशानुसार, रक्कम प्रदान करणे आवश्यक असलेल्या व्यक्तीने केलेले कोणतेही अपील, त्या रकमेच्या पन्नास टक्के इतकी रक्कम, विहित करण्यात येईल अशा रीतीने, अपीलकाराने जमा केल्याशिवाय, आयुक्ताकडून दाखल करून घेण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, वेळेत अपील दाखल करण्यापासून अपीलकारास वाजवी कारणामुळे प्रतिबंध झाला होता याबाबत आयुक्ताची खात्री पटली तर, त्यास, उक्त तीस दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर, अपील दाखल करून घेता येईल.

**९.** जर, उत्पादकाने, वितरकाने किंवा विक्रेत्याने, जिल्हा प्राधिकाऱ्याचा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत, नुकसानभरपाई प्रदान करण्यात कसूर केली असेल तर, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे ती वसूल करण्यात येईल. जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करावयाची नुकसानभरपाई.

**१०.** जर तक्रारदाराने, अन्य कोणत्याही कायद्यान्वये, अन्य कोणत्याही प्राधिकरणासमोर किंवा न्यायालयासमोर त्याच कारणासाठी नुकसानभरपाईकरिता कोणतीही तक्रार किंवा अर्ज दाखल केला असेल तर, या अधिनियमान्वये तक्रार दाखल करून घेण्यात येणार नाही. तक्रारीस रोध.

**११.** या अधिनियमाच्या तरतुदी, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांशिवाय असतील, आणि त्यांचे न्यूनीकरण करणाऱ्या नसतील. या अधिनियमाच्या तरतुदी इतर कायद्यांशिवाय असणे.

**१२.** राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, त्यास आवश्यक असल्याचे दिसून येतील असे निदेश, अन्वेषण समितीस, जिल्हा प्राधिकरणास किंवा शासनाच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यास देता येतील. निदेश देण्याचा अधिकार.

**१३.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी, तालुका कृषी अधिकारी, अन्वेषण समिती, आयुक्त किंवा शासनाचा इतर कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही वाद, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**१४.** (१) राज्य शासनाला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. नियम करण्याचा शासनाचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत झाले आणि असा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केला तर, तो नियम, अशी अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

(शा.म.मु.) एच १३२६-३ (१,०४०-८-२०२३)

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१५.** (१) जर अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्‌भवली तर, राज्य शासनास, प्रसंगानुरूप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्यासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे दिसून येईल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्याच्या सर्वांगीण विकासात व लोकांच्या कल्याणात, कृषी क्षेत्र अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी राज्यातील शेतकरी नवनवीन व सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करीत आहेत. सुधारित व संकरित बियाणे, खतांची विविध संयोजने आणि कीड व रोगांवर नियंत्रण ठेवणारी कीटकनाशके यांचा देखील वापर शेतकरी मोठ्या प्रमाणात करीत आहेत. अन्नधान्याची वाढती गरज पूर्ण करण्यासाठी, शासन, कृषी विद्यापीठे व कृषी संशोधन केंद्र, सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची शिफारस देखील करीत आहेत. सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी अधिक आर्थिक गुंतवणुकीची आवश्यकता असते, बँका व इतर वित्तीय संस्थांकडून ती उपलब्ध करून दिली जाते.

२. असे निदर्शनास आले आहे की, भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांकरिता, बियाणे अधिनियम, १९६६ (१९६६ चा ५४), कीटकनाशके अधिनियम, १९६८ (१९६८ चा ४६) व अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) यांमध्ये सौम्य शिक्षांची तरतूद असल्यामुळे, काही उत्पादक, निर्माते, वितरक, व्यापारी व विक्रेते, झटपट पैसे कमविण्यासाठी अशी भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांचे उत्पादन, निर्मिती, वितरण व विक्री करण्यात गुंतलेले आहेत. शेतकरी, बाजारातून बियाणे, खते किंवा कीटकनाशके विकत घेतात. भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांचा वापर केल्याच्या परिणामी, पीक विफल होते आणि उत्पादन कमी होते, त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते.

वर निर्दिष्ट केलेले, केंद्रीय अधिनियम व त्याखाली केलेले नियम आणि बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ व खते (असेंद्रिय, सेंद्रिय व मिश्र) (नियंत्रण) आदेश, १९८५ यांमध्ये, भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांचा वापर केल्यामुळे शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीकरिता नुकसानभरपाई प्रदान करण्याच्या तरतुदी अंतर्भूत केलेल्या नाहीत. म्हणून, शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीकरिता त्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी, भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांचे उत्पादक, निर्माते, वितरक, व्यापारी व विक्रेते यांना नुकसानभरपाई प्रदान करण्यासाठी जबाबदार धरण्याकरिता, नवीन कायदा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटते.

३. या विधेयकाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :—

(क) भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांचा वापर केल्यामुळे झालेल्या नुकसानीबद्दल शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणे ;

(ख) नुकसानभरपाईचा दावा करण्याच्या कारणांची तरतूद करणे ;

(ग) शेतकऱ्यांनी तक्रारी दाखल करण्याच्या व त्यावर कार्यवाही करण्याच्या कार्यपद्धतीची तरतूद करणे ;

(घ) शेतकऱ्यांना सोसाव्या लागलेल्या पिकांच्या नुकसानीचे, निर्धारण व मूल्यमापन करण्यासाठी अन्वेषण समितीद्वारे, कालबद्ध रीतीने, अन्वेषण करण्याची तरतूद करणे ;

(ङ) एका महिन्याच्या आत, नुकसानभरपाईचे प्रदान करण्याची आणि रक्कम प्रदान करण्यात विलंब झाल्यास, दर साल बारा टक्के दराने व्याज आकारण्याची तरतूद करणे ;

(च) अपील दाखल करण्यापूर्वी, नुकसानभरपाईच्या रकमेच्या पन्नास टक्के रक्कम प्रदान करण्याची तरतूद करणे.

**४.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **धनंजय मुंडे,**

दिनांक ३ ऑगस्ट २०२३. कृषी मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १(२).**— या खंडान्वये, ज्या दिनांकास, हा अधिनियम अंमलात येईल तो दिनांक, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नेमून देण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड २(ग).**— या खंडान्वये, जिल्हा प्राधिकरण अधिसूचित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३.**— या खंडान्वये, ज्या प्रकरणी, शेतकरी नुकसानभरपाई मिळण्यास हक्कदार असेल अशी, बियाण्यांची, खतांची किंवा कीटकनाशकांची अन्य प्रकरणे, नियमांद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४.**— या खंडान्वये,—

(क) उप-खंड (१) मध्ये, शेतकरी, ज्या नमुन्यात व ज्या रीतीने या अधिनियमान्वये तक्रार करील तो नमुना व ती रीत, विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(ख) उप-खंड (३) (च) मध्ये, अन्य प्रकरणी, ज्या मुदतीत तक्रारी दाखल करता येतील ती मुदत विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ५(१).**— या खंडान्वये, तक्रारदारास सोसाव्या लागलेल्या पिकाच्या नुकसानीचे निर्धारण व मूल्यमापन करण्यासाठी अन्वेषण समिती घटित करण्याचा अधिकार, कृषी आयुक्ताकडे घेण्यात आला आहे.

**खंड ६.**— या खंडान्वये,—

(क) उप-खंड (१) मध्ये, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जिल्हा प्राधिकरण घटित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे ;

(ख) उप-खंड (४) मध्ये, या अधिनियमान्वये प्रदान करावयाची नुकसानभरपाई निर्धारित करण्याचे निकष व कार्यपद्धती विनिर्दिष्ट करणारी मार्गदर्शकतत्त्वे वेळोवेळी जारी करण्याचा अधिकार, कृषी आयुक्ताकडे घेण्यात आला आहे.

**खंड १२.**— या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, आवश्यक वाटतील असे निदेश, अन्वेषण समिती व जिल्हा प्राधिकरण आणि शासनाचे अन्य अधिकारी यांना देण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १४(१).**— या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १५.**— या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, ती अडचण दूर करण्यासाठी, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांच्या आत, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेला आदेश काढण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर नमूद केलेले प्रस्ताव, सामान्य स्वरूपाचे आहेत.

# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४०.]**

**[ महाराष्ट्र राज्यातील भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैरछापाची बियाणे, खते किंवा कीटकनाशके यांच्या विक्रीमुळे व वापरामुळे झालेला नुकसानीकरिता शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरिता विशेष तरतुदी करण्याकरिता विधेयक. ]**

**[श्री. धनंजय मुंडे,**
कृषी मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई